Email : accas@sancharnet.in

# कॉस्ट अॅण्ड मॅनेजमेंट अकाउंटन्सी

## उज्वल भवितव्याकडे नेणारा मार्ग

केंद्र सरकारने १९५९ मध्ये संसदेत एक विशेष कायदा संमत करून द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाउंटंस् ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना केली. संस्थेचे मुख्य कार्यालय कोलकाता येथे असून, चार विभागीय कार्यालये आहेत. ते दिल्ली, चेन्नई, मुंबई येथे असून देशविदेशात एकूण ९९ शाखा आहेत.

या संस्थेचा मुख्य उद्देश कॉस्ट अॅण्ड मॅनेजमेंट व्यवसाय विकसित करणे हा असून, त्याद्वारे सामाजिक व आर्थिक विकासास मदत करणे हे उद्दिष्ट आहे. विविध वस्तूंचे उत्पादन खर्च कमीत कमी ठेवून त्यांच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी विविध पद्धतींचा अभ्यास यात केला जातो.

अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे जगात सर्व क्षेत्रात स्पर्धा वाढत आहे. या गळेकापू स्पर्धेत उच्च गुणवत्ता व कमी किंमत या संकल्पनेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. या स्पर्धेच्या युगात कॉस्ट अकाउंटंचे महत्त्व जागतिक पातळीवर वाढत असून, या क्षेत्रातील व्यावसायिकांची खूपच गरज भासत आहे.


या क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे निर्मिती परिव्यय लेखाकर्म पद्धतीचा (Cost Accounting Systems) वस्तूचे उत्पादन खर्चनिर्धारण (Cost Ascertainment) व खर्च कमी करणे (Cost Reduction) या तंत्राद्वारे उच्च दर्जाची उत्पादने, सेवा स्पर्धात्मक किमतीला उपलब्ध करून देणे, तसेच अनावश्यक खर्च नियंत्रणात ठेवणे, अशा प्रकारची आव्हानात्मक कार्ये केली जातात. कॉस्ट अकाउंटंटस्ना नेहमी कमी किमतीत उच्च दर्जाची उत्पादने व सेवा कशा देता येतील यावर विविध पर्याय विचारले जातात. आपल्या वैयक्तिक जीवनात आपण वस्तूंच्या किमतीविषयी जागरूक असतो. आपण देत असलेल्या प्रत्येक रुपयातून योग्य मोबदला कसा मिळेल, याचा प्रत्येक जण विचार करतो. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीमध्ये एक कॉस्ट अकाउंटंट असतो, असे म्हणता येईल. यासाठीच शास्त्रीय पद्धतीने द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाउंटंट ऑफ इंडिया प्रशिक्षण देते.

अशा प्रशिक्षित कॉस्ट अॅण्ड मॅनेजमेंट अकाउंटंटस्ना सरकारी क्षेत्र, उद्योग जगत, वित्तीय व सेवा क्षेत्रामध्ये उच्च पदावर काम करण्याची संधी मिळते. तसेच पुढील क्षेत्रामध्ये स्वतःचा व्यवसायही करता येतो.

कॉस्ट अकाउंटिंग सिस्टिम चालू करणे अर्थसंकल्पीय नियंत्रण, व्यवस्थापन, अंकेक्षण, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर, प्रोजेक्ट रिपोर्ट व फायनान्स तसेच परिव्यय मूल्य निर्धारण आणि नियंत्रण (Cost Control) इत्यादी कंपनी कायदा १९५६ च्या २३३ (ब) कलमाद्वारे परिव्यय अंकेक्षण, उत्पादन शुल्क अंकेक्षण कलम १४ अ आणि १४ A, A, B. या व्यतिरिक्त उद्योग जगतात उच्च पदावर नोकरीच्या अनेक संधी प्राप्त होतात.

कॉस्ट अकाउंटिंग हा विषय उत्पादनाच्या किमतीशी निगडीत आहे. यात उत्पादनाचे निर्मितीमूल्य त्यातून मिळणारा नफा इत्यादीचा अभ्यास केला जातो. एखाद्या कंपनीचा नफा वाढविण्यासाठी त्यातील निर्मितीमूल्य, श्रमिक खर्च (labour power) विक्री या बाबींचा विचार केला जातो.

कॉस्ट अॅण्ड मॅनेजमेंट अकाउंटंट होण्यासाठी द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाउंटंट ऑफ इंडिया (आयसीडब्ल्यूआय) या संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षा यशस्वीपणे पास कराव्या लागतात.



कोणत्याही शाखेचा पदवीधर व वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली व्यक्ती या कोर्सला प्रवेश घेऊ शकते. पदवी नसेल तर बारावी पास झाल्यावर फाउंडेशनची परीक्षा द्यावी लागते. फाउंडेशन परीक्षेचा कालावधी सहा महिन्यांचा असून, यात चार विषय असतात. १) ऑर्गनायझेशन अॅण्ड मॅनेजमेंट, २) अकाउंटिंग ३) अर्थशास्त्र (Economics Fundamentals) ४) बिझिनेस मॅथेमॅटिक्स. अॅण्ड स्टॅटिस्टिक्स इत्यादी फाउंडेशन परीक्षा पास झाल्यावर हा कोर्स दोन टप्प्यांमध्ये विभागला आहे. १) इंटरमीजिएट आणि २) फायनल. या दोन्ही टप्प्यात प्रत्येकी आठ पेपर्सची परीक्षा दोन ग्रुपमध्ये द्यावयाची असते. या कोर्समध्ये नुकत्याच काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार इंटरमीजिएटला आठ पेपर्ससह दोन ग्रुप डिस्कशनं, दोन सेमिनार्स आणि संगणक प्रशिक्षण (५० तास) चा कालावधी अनिवार्य आहे. इंटरच्या प्रत्येक ग्रुपचा कालावधी सहा महिन्यांचा असतो. इंटरमीजिएट पूर्ण केल्यानंतर फायनल परीक्षेसाठी प्रवेश घेता येतो. फायनलसाठी आठ पेपर्स बरोबर संगणक प्रशिक्षण (१०० तास), मॉड्यूलर ट्रेनिंग, ऑडिट इत्यादीबरोबरच या क्षेत्राशी संबंधित कोणत्याही एका विषयावर ५००० शब्दांचा एक प्रोजेक्ट इन्स्टिट्यूटला सादर करावा लागतो.

आय.सी.डब्ल्यू.आय. तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. आय.सी.डब्ल्यू.ए. कोर्सला फार महत्त्व आहे. परीक्षेपुरता अभ्यास केला आणि पास झालो, असे या कोर्समध्ये करता येत नाही. अतिशय मेहनत घेऊन अभ्यास करावा लागतो. संपूर्ण वर्षभरात कोर्स पूर्ण करण्याचे ध्येय ठेवून अभ्यास करावा लागतो. अभ्यासाबरोबरच या प्रकारे स्वतःची मानसिक तयारी करणेही आवश्यक आहे.

आज मेडिकल, इंजिनिअरिंग, एमबीए इत्यादी कोर्स करण्यासाठी प्रचंड फी आहे. त्यापेक्षा या कोर्सला खर्च खूपच कमी येतो. फाउंडेशन, इंटर आणि फायनल पूर्ण करण्यासाठी साधारण रु. २००००/- (वीस हजार) खर्च येतो. यात फीस, पुस्तके आदीसह हा कोर्स करण्यासाठी कठोर मेहनत व इच्छाशक्ती असण्याची फार आवश्यकता असते.

प्रतिवर्षी जून आणि डिसेंबरमध्ये या कोर्सला प्रवेश घेता येतो.

**अधिक माहितीसाठी संपर्काचा पत्ता :**
औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाउंटंटस्,
फ्लॅट नं. ए-९, चैतन सुपर मार्केट,
त्रिमूर्ती चौक, जवाहर कॉलनी, 2351848
औरंगाबाद - दूरध्वनी क्र. ०२४०-२३२१८२८/
कार्यालयीन वेळ : ९ ते १ व ३ ते ९
(रविवार बंद)

**– एस. बी. रुडके,**
**अध्यक्ष, औरंगाबाद चॅप्टर**

# SUCCESSFUL CAREER IN COST & MANAGEMENT ACCOUNTANCY

BY S.B. KHADKE

The Institute of Cost and Works Accountants of India is constituted by an Act of Parliament, having its headquarters at Kolkota, regional offices at Delhi, Chennai, Mumbai and branches at around 99 major cities in India and abroad.

The prime objective of the institute is to develop Cost and Management accountancy profession with the intention to serve the society and the country towards the achievement of highest productivity with lowest resources through the techniques of cost control and cost reduction.

Globalization and liberalization has resulted in sharp competition by the industry. Cut throat competition has results of quality product with lower costs. Here comes the role of cost and management accountant. The cost accountant develops the costing systems by which the costs are ascertained, controlled and reduced. The professional services of the cost accountants enables the industry to deliver quality product with the minimum costs. Unwarranted and undeserved costs are slashed, rejections, wastes and losses are zeroed and a better quality product/service is delivered at lowest costs. The Cost and Management Accountant always asks one question -- Why? He suggests better and alternative ways for reducing costs and enhancing quality.

In fact, in real life, everybody is cost conscious. We, in our routine life, are always endeavoring our resources for better returns. Always it is our objective that each rupee in our pocket should bring higher returns. Thus there is a cost accountant hidden in every human being.

This fundamental principle of life is professionally implemented by the cost accountants in industry with the standard cost accounting principles and practices. The costing profession fetches you higher returns for lower inputs. Miracles are happening in the area of cost of the product and services.



That's why there is tremendous scope for this profession. The Cost and Management Accountant occupy top ranking positions in government, big industrial houses, and commercial organizations. In view of current scenario, the services of Cost and Management Accountant are indispensable.

A Cost and Management Accountant can undertake following assignments:

* Cost consultancy in the areas of installation of costing system, budgetary control system, management audit, taxation, project report and project financing, cost control and cost-reduction systems.

* Cost audit under section 233(B) of the Companies Act -- 1956.

* Certification of cost and other statements as required by department of excise and customs.

* Excise audit under section 14-A and 14AA

Apart from this, the industrial world provides great employment prospects to the Cost Accountants.

*Who can become a Cost and Management Accountant?*

Any person whose age is above 18 and graduate of any discipline can join the course. Person who have not completed the graduation, are required to pass foundation examination. The foundation course covers Fundamentals of Management, Accounting, Economics, Mathematics and Statistics.

The graduation course is divided in two parts: 1) Intermediate and 2) Final.

The Intermediate part has again two stages- stage-I and stage-II each stage containing 4 papers.

Similarly Final part has two stages- stage-I and stage-II, each stage containing 4 papers.

Each stage (for Final as well as Intermediate) has duration of 6 months. So one can complete this course within a period of 2 1/2 years if he appears every exam and passes it without failing any examination.

While pursuing the study, the student must undergo the practical computer training.

There are number of examinations available to the students depending upon their basic/professional qualification.

Thus student has to undergo studies of 16 subjects of various areas such as Costing, Accounting, Economics, Finance, Information Technology, Management, Laws, Taxation, Operational Research Techniques, Computer Studies etc. After passing through these subjects, the student is awarded qualification of Graduate Cost and Works Accountant. (Grad-CWA) in totality, we can say that the graduate is well equipped with the rich knowledge bank of whole of commerce and industry.

*Cost of doing the course:* Nowadays, for professional courses like medical, engineering, MBA, one has to spend in lacs. Everybody will be surprised to know the cost of doing this course.

For doing Foundation, Intermediate and Final courses, total cost is not more than Rs. 30,000/- (This includes fees, books, study material etc.)

One most important prerequisite is determination, honesty with hard work and studies.

Dates of admission and examinations: The admissions for this course take place in January and June every year.

*(The writer is chairman of Aurangabad Chapter of Cost Accountants, Aurangabad)*